# गर्भधारणा रोखणाऱ्या किशोरवयीन मुलींच्या गोपनीयतेचे रक्षण करा

## मुंबई उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला निर्देश

**मुंबई–** नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांकडे जाऊन गर्भधारणा संपुष्टात आणण्यासाठी येणाऱ्या किशोरवयीन मुलींच्या गोपनीयतेचे रक्षण करण्यासाठी तीन आठवड्यांत मार्गदर्शक तत्त्वे तयार करा आणि ती गाईडलाईन्स अधिसूचित करा, असे निर्देश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. गर्भधारणा संपवण्यासाठी डॉक्टरांकडे जाणाऱ्या किशोरवयीन मुलींची माहिती पोलीस मागतात. यातून मुलींची ओळख उघड होत असल्याच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने हा आदेश दिले.

स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. निखिल दातार यांच्यासह काही डॉक्टरांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. याचिकेवर न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठाने सुनावणी घेत राज्य सरकारला मार्गदर्शक तत्त्वे आखण्याबाबत कार्यवाहीला वेग देण्याचा आदेश दिला. पोलीस त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन करत आहेत, सहमतीने झालेल्या शारिरिक संबंधांनंतर वैद्यकीय गर्भपात अर्थात एमटीपीसाठी त्यांच्याकडे येणाऱ्या किशोरवयीन मुलींची नावे मागतात. यातून किशोरवयीन मुलींची ओळख उघड होत आहे, असा दावा याचिकाकर्त्या डॉक्टरांनी उच्च न्यायालयात केला. खंडपीठाने राज्य सरकारला गोपनीयता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने ठोस पावले उचलण्याचे निर्देश दिले.

लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण (पोक्सो) कायदा, २०१२ अंतर्गत सध्याचे मस्ट्रॅटजॅकेट फॉर्म्युलाफ किशोरवयीन मुलांमधील सहमतीने झालेल्या संबंधांच्या प्रकरणांमध्ये अडचणी निर्माण करीत आहे, याकडे याचिकाकर्त्या दातार यांनी लक्ष वेधले. २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार गर्भधारणा संपवण्यासाठी डॉक्टरांकडे येणाऱ्या किशोरवयीन मुलींची माहिती पोलिसांना देणे बंधनकारक नाही. असे असताना पोलीस किशोरवयीन मुलींची ओळख उघड करण्यास डॉक्टरांना भाग पाडत असल्याचे सांगण्यात आले.

# चांगदेवनगर परिसरात बिबट्याचा धुमाकूळ

**पुणतांबा (वार्ताहर)–** चांगदेवनगर व अठरावाडी परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढला असून शेतकऱ्यांच्या पशुधनावर बिबट्याच्या भक्षस्थानी पडत आहे. या नुकसानीचा पंचनामा करून वन विभागाने शेतकऱ्यांना आर्थिक भरपाई द्यावी, अशी मागणी भारतीय किसान मोर्चाचे उत्तर नगर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भोरकडे यांनी केली आहे.

पुणतांबा परिसरात दोन दिवसांपूर्वी गरीब कुटुंब असलेल्या कुंभे यांच्या गायीचा गळा बिबट्याने पकडून ताव मारला. या हल्ल्यात गाय मृत झाली. तसेच वाल्मीक घोडेकर व संदीप धनवटे यांच्या वासराचा देखील बिबट्याने बळी घेतला आहे. नुकताच कै. सावित्राभाऊ थोरात यांच्या वस्तीवर एक बिबट्या जेरबंद झाला आहे. असा पिंजरा चांगदेवनगर परिसरात देखील लावावा. तसेच पुणतांबा परिसरात बिबट्यांचा वारंवार वाढल्यामुळे शेतकऱ्यांच्या पशुधनावर होत असलेल्या हल्ल्यांमुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शिवाय पशुधनाच्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणीही वाढल्या आहेत. या सर्व घटनांचा पंचनामा करून शेतकऱ्यांना त्यांच्या पशुधनाच्या किंमतीची नुकसानभरपाई वन खात्याने द्यावी, अशी मागणी बाळासाहेब भोरकडे यांनी केली आहे.

# टाकळीभान येथे रखडलेल्या बस स्टँण्ड व सुलभ शौचालय बांधकामासाठी रास्ता रोकोचा इशारा



**टाकळीभान (वार्ताहर)–** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे बस थांब्यासाठी बस स्टँण्ड नसल्याने प्रवाशांना, महिलांना व विद्यार्थी-विद्यार्थिनींना उन्हात, वाऱ्यात, पावसात रस्त्याच्या कडेला ताटकळत उभे राहावे लागत असल्याने येथील तरुणांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे बसस्टँण्ड व सुलभ शौचालय बांधण्याबाबत निवेदन दिले असून यात रास्ता रोकोचा इशारा देण्यात आला आहे.

या निवेदनात म्हंटले आहे की, टाकळीभान हे तालुक्यातील मोठे गाव आहे. या गावातून तसेच पंचक्रोशीतील अनेक गावातील ग्रामस्थ तसेच शालेय विद्यार्थी शिक्षण, नोकरी तसेच इतर दैनंदिन कामासाठी तालुक्याच्या ठिकाणी जातात. स्टँण्डवर आल्यानंतर बस येईपर्यंत या प्रवाशांना तसेच विद्यार्थ्यांना बसस्टँण्ड नसल्यामुळे रस्त्याच्या कडेला तासनतास ताटकळत उभे राहावे लागते. या ठिकाणी पूर्वी बसस्टँण्ड होते, मात्र, रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली हे बसस्टँण्ड रस्ता रुंदीकरणाला आडथळा ठरत नसतानाही पाडले गेले आहे. तसेच या ठिकाणी बस स्टँण्डसाठी निधी मंजूर आहे. मात्र, निधी मंजूर असतानाही अधिकाऱ्यांच्या ढिलाईमुळे ते होऊ शकले नाही. टाकळीभानचा परिसर विस्तीर्ण असल्याने गावातील लोकसंख्या व विद्यार्थी संख्या प्रचंड वाढली आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना विद्यार्थी बसची वाट पाहत उभे असतात. महिला व विद्यार्थीनींची यावेळी प्रचंड हेळसांड होते. तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने लवकरात लवकर या ठिकाणी बसस्टँण्ड व सुलभ शौचालय बांधावे, अन्यथा टाकळीभानचे संतप्त ग्रामस्थ व विद्यार्थी रास्तारोको आंदोलन करणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावर काकासाहेब कोकणे, सचिन माने, विकास पटारे, साईनाथ खंडागळे, भाऊसाहेब पवार, बद्रीनाथ पटारे आदींच्या सह्या आहेत.

# मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांची रविवारी निवड

**पुणे (प्रतिनिधी)–** शतकपूर्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांची निवड रविवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी होणार आहे. सातारा येथे नियोजित असलेल्या या संमेलनाच्या अध्यक्षपदाची घोषणा अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या होणाऱ्या बैठकीत केली जाईल. याच बैठकीत संमेलनाच्या नेमक्या तारखांचीही घोषणा करण्यात येणार आहे.

सध्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत असलेली नावे गुलदस्तात असली, तरी काही महत्त्वपूर्ण घडामोडी उघडकीस आल्या आहेत. महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी काही महिन्यांपूर्वी ज्येष्ठ साहित्यिक तथा कोसलाकार भालचंद्र नेमाडे यांच्या निवासस्थानी भेट घेऊन त्यांची मनधरणी केल्याचे समजते. साहित्य संमेलनाला रिकामटेकड्यांचा उद्योग असे संबोधणाऱ्या नेमाडे यांना अध्यक्षपद स्वीकारण्यासाठी राजी करण्याचा प्रयत्न प्रा. जोशी यांनी केला होता. ही मकृष्णशिष्टाईफयशस्वी ठरल्यास नेमाडे या ९९व्या किंवा आगामी १००व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्याचे पाहायला मिळू शकते, अशी चर्चा आहे. नेमाडे यांच्याप्रमाणेच संमेलनावर टीका करणारे आणखी एक ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांनाही अध्यक्षपदासाठी विचारणा करण्यात आल्याचे वृत्त आहे.

संमेलनाध्यक्ष निवड प्रक्रिया आणि उपस्थित सदस्य: महामंडळाच्या बैठकीत एकूण १९ सदस्य उपस्थित राहतील. यामध्ये चार घटक संस्थांचे प्रत्येकी तीन असे १२ प्रतिनिधी, बृहन्महाराष्ट्रातील समाविष्ट व संलग्न संस्थांचे ६ प्रतिनिधी आणि विद्यमान अध्यक्ष यांचा समावेश असेल. घटक, संलग्न आणि समाविष्ट संस्थांनी सुचवलेल्या नावांवर सविस्तर चर्चा करून संमेलनाध्यक्षांच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब केले जाईल. या महत्त्वाच्या बैठकीपूर्वी शनिवारी (१३ सप्टेंबर) महामंडळाच्या मार्गदर्शक समितीची बैठक होणार आहे. या बैठकीत संमेलनाच्या रूपरेषेवर चर्चा केली जाईल.

पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे (मसाप) महामंडळाचे कार्यालय स्थलांतरित झाल्यानंतरचे हे पहिलेच संमेलन आहे. विशेष बाब म्हणजे हे संमेलन मसापच्याच कार्यक्षेत्रात होणार असून, मसापची शाहूपुरी शाखा संमेलनाचे संयोजन करणार आहे. गेल्या काही वर्षांपासून संमेलनांमधील साहित्यबाह्य कार्यक्रम आणि अव्यवस्था यावर अधिक चर्चा होत असल्याने, महामंडळाच्या नूतन कार्यकारिणीने याबाबत उपाययोजना करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# उपोषण करताच पोलीस प्रशासन नमले

## लेखी पत्र मिळाले : कार्यवाहीच्या आश्वासनानंतर पानसरेंचे उपोषण मागे



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** अपमानास्पद वागणूक देणाऱ्या अधिकाऱ्याची चौकशी करावी तसेच बँकेबाबतचे पत्र मिळावे यासाठी अनेकदा मागणी केली. निवेदन दिली. तरीही दखल घेतली गेली नाही. अखेर सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी राजेंद्र पानसरे यांनी काल उपोषण करताच पोलिस प्रशासन नमले. संबंधित बँकेबाबतचेही लेखी पत्र देण्यात आले. एवढेच नव्हेतर या प्रकरणाची चौकशी करून अहवाल दिला जाईल असे आश्वासन उपविभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर यांनी दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

बँकेला खुलासाचे पत्र द्यायचे म्हणून पोलीस ठाण्यात पानसरे गेले असता त्यांचे काहीही ऐकून न घेता तेथील अधिकाऱ्यांनी त्यांना अपमानास्पद वागणूक देऊन कार्यालया बाहेर हुसकावून दिले, या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी राजेंद्र पानसरे यांनी निवदेनाद्वारे मागणी केली होती. पण त्याची दखल घेतली नाही. त्यानंतर त्यांनी उपोषणाचा इशाराही दिला होता. पण पोलिस प्रशासन हलले नाही. शेवटी काल बुधवारी पानसरे थेट उपोषणास बसले. त्याला शहरातील अनेक मान्यवरांनी भेट देत पाठिंबा दिला. त्यानंतर पोलिस प्रशासन हलले. संबंधित बँकेचे खुलाशाचे पत्र देण्यात आले. तसेच संबंधित प्रकरणाची योग्य ती चौकशी करून कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन उपविभागीय अधिकारी भवर यांनी दिल्यानंतर पानसरे यांनी उपोषण मागे घेतले. उपोषण सोडतेवेळी अशोक थोरे, बाळासाहेब घाटे, जगदीश बेसारी, दत्तात्रय काशीद, राजेंद्र गवारे, सचिन जगताप, आय्यब सय्यद, श्री.बाराते, राजेंद्र गवारे, नंदकिशोर लबडे, बापूसाहेब वडीतके, विकास थोरात, श्री.कल्याणकर संदीप शरमाळे, एम.के पिलघर, शिवाजी बारगळ आदीं उपस्थित होते.

दरम्यान, उपोषणाला माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे, सचिन गुजर, प्रकाश चित्ते, ज्ञानेश्वर मुरकुटे, बाबासाहेब दिघे, राजेंद्र देवकर, सोपानराव राऊत, अशोक उपाध्ये, राजेंद्र सोनवणे, नितीन बनकर, अभिजीत लिप्टे, बाळासाहेब तोरणे, श्रीधर आदिक, शफी शाह, निखिल पवार, रिजवान पठाण, राजेंद्र थोरात, विकास थोरात, गुलाबराव पादीर, अण्णासाहेब डावखर, रज्याक पठाण, लकी सेठी, करिम रमजानी, अहमद जाहागिरदार, सागर गवारे, अय्याज तांबोळी, मोहनता यादव, अशोक जगधने, राहुल बनकर, सुनील बोलके, सदाशिव पठारे, दिलीप नागरे, महेंद्र लोढा, पुरुषोत्तम थोरात, शिवाजी थोरात, प्रकाश थोरात, दीपक थोरात, माजी सभापती सुधीर नवले, अहमद शेख, चंपालाल फोपळे, सुखदेव वाघमारे, संजय छल्लारे, रवींद्र गुलाटी, पाशा शिवरकर, अशोक बागुल आदींनी उपोषणास भेट दिली.

# पंढरपूर येथील शनैश्वर देवस्थानच्या मठात शिवलिलामृत पारायण सुरू



**नेवासा फाटा (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील हंडीनिमगाव येथील त्रिवेणीश्वर महादेव देवस्थानचे प्रमुख महंत रमेशानंदगिरी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर येथील सांगोला रस्त्यावर शनैश्वर देवस्थानच्या मठामध्ये चार दिवशीय शिवलिलामृत पारायण सोहळ्यास प्रारंभ झाला आहे.

८ ते ११ सप्टेंबर या कालावधीत होत असलेल्या शिवलिलामृत पारायण सोहळ्यामध्ये पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते ९ पारायण, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५ ते ६.३० हरिपाठ, ७ ते ९ किर्तन असे कार्यक्रम होत आहेत. या सोहळ्याला भांड महाराज, चांगदेव महाराज नेहे यांनी प्रवचन सेवा दिली तर पिचडगाव येथील महंत ज्ञानेश्वर महाराज हजारे, रामानंदगिरी महाराज, सविताताई महाराज दरंदले यांनी सोहळ्याला भेट देऊन किर्तनरुपी सेवा दिली. गुरुवार दि. ११ सप्टेंबर रोजी रमेशानंदगिरी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने सोहळ्याची सांगता होणार आहे. या सोहळ्यासाठी त्रिवेणीश्वर भक्त परिवारातील सेवेकरी व पंचक्रोशीतील भाविक सहभागी झाले आहेत. कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सोहळ्याचे मार्गदर्शक राजेंद्र थोटे व रमेशानंदगिरी महाराज यांनी केले आहे.

# कानिफनाथ मित्रमंडळाचा भंडारा उत्साहात




**बेलापूर (वार्ताहर)–** येथील श्री कानिफनाथ मित्र मंडळाच्या वतीने गणेशोत्सव निमित्ताने महाप्रसाद भंडारा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कानिफनाथ मित्र मंडळाचे अध्यक्ष ओम शेजुळ, कार्याध्यक्ष अक्षय काळे, उपाध्यक्ष रूद्र नाईक, सचिव अभिषेक नाईक, खजिनदार सार्थक गोत्राचे आदींच्या अधिपत्याखाली श्री केशव गोविंद गल्ली येथे भक्तिमय आणि उत्साहात हा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस अरुण पाटील नाईक, शासकीय लेखा परीक्षक संजय गोरे, बंडूभाऊ जाधव, महेश कुमावत, ऋषिकेश नाईक, रविंद्र जाधव, सुरेश शेजुळ, रविंद्र कर्पे, विक्रम नाईक, रविंद्र जगताप आदींसह भाविक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ओम गोत्राचे, शुभम जगताप, विराज शेजुळ, सार्थक कर्पे, प्रथमेश गोत्राचे, सार्थक जगताप यांनी परिश्रम घेतले.

## पान १ वरुन

### पीयूसी नाही तर पेट्रोल-डिझेल...

केले.

**सीसीटीव्हीद्वारे स्कॅन करणार वाहन क्रमांक**

परिवहन आयुक्त कार्यालयात झालेल्या बैठकीनुसार, राज्यातील प्रत्येक पेट्रोल पंपावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे प्रत्येक वाहनाचा क्रमांक स्कॅन करून त्याचे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र तपासले जाईल. प्रमाणपत्र वैध नसेल तर त्या वाहनाला इंधन दिले जाणार नाही.

**अवैध प्रमाणपत्रांवर कारवाई**

या बैठकीत सरनाईक यांनी अवैध मार्गाने पीयूसी प्रमाणपत्र देणाऱ्या टोळ्यांवर धडक कारवाई करण्याचे आदेशही दिले. भविष्यात वाहन विक्री करणारे शोरूम्स आणि गॅरेजेसमध्येही पीयूसी प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था केली जाईल, जेणेकरून रस्त्यावरील प्रत्येक वाहनाकडे वैध प्रमाणपत्र असेल आणि प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.

### १३ ते १८ सप्टेंबरदरम्यान...

सरकल्यामुळे महाराष्ट्रात नव्याने आर्द्रता खेचली जात आहे. त्यामुळे शनिवार (१३ सप्टेंबर) पासून पावसाला पुन्हा प्रारंभ होईल, असा अंदाज आहे. जिल्ह्यातील शेतकरी सध्या खरीप हंगामातील पिकांच्या शेवटच्या टप्प्यातील कामकाजात गुंतलेले आहेत. मात्र, रब्बी हंगामासाठी आवश्यक आर्द्रता व मातीतील ओल राखण्यासाठी परतीच्या पावसावरच शेतकऱ्यांची मदार आहे. जर अपेक्षेप्रमाणे पाऊस झाला तर गहू, हरभरा, ज्वारीसारख्या पिकांची लागवड वेळेवर होईल आणि उत्पादनात वाढ होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील शेतकरी आता पावसाची आतुरतेने वाट पाहत असून परतीच्या पावसावर संपूर्ण रब्बी हंगामाचे भविष्य अवलंबून राहणार आहे.

### सरसकट कुणबी प्रमाणपत्र...

कुणबी नातेसंबंध, ग्रामसमिती, तहसीलदारांच्या स्तरावरील समितीचा अहवाल घ्यावा लागणार आहेत. खोट्या अथवा बनावट नोंदींद्वारे ओबीसी प्रमाणपत्र कोणालाही दिले जाणार नाही, अशी ग्वाही बावनकुळे यांनी बैठकीनंतर प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना दिली. वंशावळ जुळल्यानंतर सर्व कागदपत्रांच्या पूर्ततेनंतरच दाखला देण्यात येईल. फक्त खोट्या नोंदी होणार नाहीत याबाबत उपविभागीय अधिकाऱ्यांनी काळजी घेण्याची आवश्यकता असून शासन निर्णयाप्रमाणेच पुढे जावे अशी अपेक्षा उपसमितीतील सर्वच सदस्यांची भावना असल्याचे बावनकुळे म्हणाले.

ओबीसी समाजात ३५३ जाती आहेत. या जातींवर अन्याय होऊ नये. सुमारे ३ हजार ६८८ कोटींचा निधी मिळणे बाकी आहे. त्यामुळे १२०० कोटी रुपयांची शिष्यवृत्ती थांबली असून ती मार्गी लावण्यात यावी. वसतिगृह बांधकाम आणि शासकीय कार्यालयांसाठी आवश्यक असलेल्या जागा उपलब्ध व्हाव्यात, असे प्रस्ताव मंत्रिमंडळ उपसमिती समोर ठेवण्यात आले. कुणबी मराठा-मराठा कुणबी प्रमाणपत्र देताना चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे दिले जाऊ नये ही अपेक्षाही सदस्यांनी व्यक्त केल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. या बैठकीला वनमंत्री गणेश नाईक, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, जलसंधारण मंत्री संजय राठोड, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे आणि इतर मागास विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज आदी उपस्थित होते.

**उपसमितीच्या बैठकीत झालेली चर्चा**

मराठा जातीचा ओबीसी संवर्गात समावेश करण्यात येऊ नये.

ओबीसी विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमास १०० टक्के शिष्यवृत्ती लागू करावी.

परदेशात उच्च शिक्षणासाठी देण्यात येणारी शिष्यवृत्ती ७५ विद्यार्थ्यांची संख्या वाढवून २०० करावी.

म्हाडा, सिडकोच्या घरकुल योजनेत ओबीसी संवर्गासाठी आरक्षण लागू करावे.

इतर मागास आर्थिक विकास महामंडळाला ड.जनार्दन पाटील यांचे नाव द्यावे.

प्रत्येक शहर, तालुका स्तरावर ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज ग्रंथालय सुरु करण्यात यावे.

ओबीसी आर्थिक विकास महामंडळाला एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी.

### महापालिका निवडणुकीसाठी...

घेतले होते. त्यानंतर बुधवारी उद्धव ठाकरे हे पुन्हा संजय राऊत, अनिल परब यांच्यासह राज ठाकरे यांच्या निवासस्थानी दाखल झाले. त्यावेळी मनसेचे नेते बाळा नांदगावकर, संदीप देशपांडे उपस्थित होते. ठाकरे गट आणि मनसेच्या नेत्यांमध्ये जवळपास अडीच -तीन तास चर्चा झाली.

काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार यांनी सोमवारी मातोश्री वर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली होती. या भेटीवेळी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीबाबत चर्चा झाली. उद्धव ठाकरे हे महापालिका निवडणुकीत राज ठाकरे यांना सोबत घेण्यावर ठाम आहेत. त्याची कल्पना ठाकरे यांनी काँग्रेस नेत्यांना दिली. त्यामुळे दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येऊन निवडणूक लढवणार असल्यास काँग्रेस वेगळा निर्णय घेण्याशिवाय पर्याय नाही. मात्र, काँग्रेससाठी मुंबईची निवडणूक स्वबळावर लढायची किंवा कसे, याचा निर्णय दिल्लीतून होऊ शकतो.

या पार्श्वभूमीवर उद्धव आणि राज ठाकरे यांच्यात झालेल्या बैठकीत महापालिका निवडणुकीपुरती महाविकास आघाडीतून बाजूला होण्याबाबत चर्चा झाली. मुंबई महापालिकेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला सोबत घेण्याबाबत बैठकीत चाचपणी झाल्याचे समजते. त्यासाठी लवकरच शरद पवार यांच्याशी चर्चा करण्यात येणार आहे. येत्या २ ऑक्टोबर रोजी ठाकरे गटाचा दसरा मेळावा शिवाजी पार्कवर होत आहे. या मेळाव्यात राज ठाकरे यांच्यासोबतच्या युतीवर शिक्कामोर्तब होऊ शकते, अशी माहिती सूत्रांनी दिली.

**भेट राजकीय नव्हती**

दरम्यान, राज ठाकरे यांच्या निवासस्थानी राजकीय कार्यक्रम नव्हता. आजची भेट राजकीय नव्हती. गणपतीच्या वेळेला उद्धव ठाकरे हे राज ठाकरे यांच्या घरी गेले तेव्हा राज यांच्या मातोश्री आणि उद्धव यांच्या मावशी म्हणजे कुंदाकाकी यांनी निघताना उद्धव ठाकरे यांना सांगितले की, गर्दीमुळे आपल्याला बोलता आले नाही. तेव्हा पुन्हा नंतर मला भेटायला या. त्यानुसार कुंदा मावशींना भेटायला आज उद्धव ठाकरे राज यांच्या घरी गेले होते, असा खुलासा संजय राऊत यांनी या बैठकीनंतर प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना केला.

### ना. विखे-पाटील यांची...

हैदराबाद गॅझेटबाबत काढलेल्या शासन निर्णयावर अभ्यासक टीका करत आहेत. याकडे लक्ष वेधले असता, अनेक कसोट्यांना पार करावे लागणार नाही. प्रक्रिया सुरू झाल्यानंतर त्यात काही अडथळे आले तर ते दूर करू. मंत्री छगन भुजबळ शासन निर्णयाबाबत आक्षेप घेत आहेत. त्यांच्याशीही आम्ही चर्चा करू, असे विखे पाटील म्हणाले.

### उपसंचालक आणि...

हादरवणारी ही कारवाई ठरली आहे.

शिक्षक भरती घोटाळा हा राज्यभर गाजत असून विविध ठिकाणी त्या संबंधित गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यासंबंधी आतापर्यंत अनेकांना अटक करण्यात आली आहे.

**पोलिसांची राज्यपातळीवर एसआयटी गठित**

शिक्षण विभागातील काही भ्रष्ट वरिष्ठ अधिकारी, कर्मचाऱ्यांनी संगनमत करून ऑनलाईन शालार्थ आयडी प्रणालीचा गैरवापर केला आणि बनावट शालार्थ आयडी तयार केल्याचं समोर आलं आहे. त्या माध्यमातून बोगस शिक्षकांच्या नावे कोट्यवधी रुपयांचे वेतन अदा करण्यात आले आहे. या माध्यमातून शासनाला कोट्यवधींचा चुना लावण्यात आला.

शालार्थ आयडी घोटाळा प्रकरणात आता पोलिसांचीच राज्यपातळीवर एसआयटी गठित करण्यात आली आहे. बोगस शिक्षक भरती प्रकरणी सर्व तक्रारीची या एसआयटी अंतर्गत एकत्रित चौकशी करण्यात येणार आहे. नागपुरातील झोन २ चे पोलिस उपायुक्त नित्यानंद झा हे सध्या नागपुरात स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाचे नेतृत्व करत आहेत. आता त्यांच्याच नेतृत्वात राज्यातील इतरही जिल्ह्यात या घोटाळा प्रकरणात दाखल गुन्ह्याची चौकशी केली जाणार आहे.

नागपूर, भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर जिल्ह्यातून आतापर्यंत या घोटाळ्यात २४ अधिकारी आणि मुख्याध्यापकांना अटक करून प्राथमिक आरोपपत्रही न्यायालयात दाखल केले आहे. नागपूर पाठोपाठ जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव येथेही बनावट शालार्थ आयडी प्रकरणाशी संबंधित ३ गुन्हे दाखल आहेत. घोटाळ्याची व्याप्ती राज्यभरात असल्याने तपास पथकाची अधिकार कक्षा वाढवण्यास पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी मंजुरी दिली आहे.

### नेपाळनंतर फ्रान्समध्ये...

तसेच देशाचे आर्थिक व्यवस्थापन अधिकच बिघडवले आहे.

ब्लॉक एव्हरीथिंग हे फ्रान्समधील आंदोलनाचे नाव आहे. यामागचा उद्देश असा आहे की, देशाची सध्याची राजकीय व्यवस्था आता जनतेसाठी उपयुक्त नाही. ही व्यवस्था उजव्या विचारसरणीच्या लोकांनी सुरू केली होती, मात्र आता ती डाव्या आणि अति-डाव्या विचारसरणीच्या लोकांनी ताब्यात घेतली आहे. त्यामुळे लोक रस्त्यावर उतरले आहेत. आंदोलकांचे म्हणणे आहे की, जर व्यवस्था काम करत नसेल तर देशातील यंत्रणा बंद करा. त्यामुळे आंदोलकांनी महामार्ग, शहरे आणि वाहतूक व्यवस्था बंद करण्याची घोषणा केली. त्यामुळे याला ब्लॉक एव्हरीथिंग असे म्हटले जात आहे.

### अकोलेत क्रांतीवीर राघोजी...

पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे हे करत असून सदर प्रकाराबाबत कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता राजुर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक सरोदे यांनी विशेष खबरदारी घेतली .

सदर स्मारकाची झालेली विटंबना ही ठेकेदाराकडून जरी झाली असली तरी शासकीय विभागाकडून आपले हात वर केले गेले आहे. आम्ही सदर ठेकेदाराला स्मारक काढण्याची किंवा स्मारकाचे नुकसान होईल असे कोणतेही आदेश दिले नसल्याचे सार्वजनिक बांधकाम खात्याकडून लेखी पत्रकाद्वारे सांगण्यात आले आहे.